# प्रेस नोट दि. १४/१०/१७

माकेटयार्ड पो स्टे गुन्हा रजि नं २०४/१७ भ दं वि क ४५४, ४५७, ३८० या दाखल गुन्ह्यामध्ये अनोळखी चोरट्याने १२३ तोळे सोने व रोख असा ३९,९२,०००/- रु. चा माल चोरुन नेला. सदर गुन्ह्याचा तपास करत असताना सी सी टी व्ही फुटेज प्राप्त करुन बातमीदार मार्फत आरोपीची माहिती काढून राजस्थान येथील  दातीना या गावातून दोन इसम ताब्यात घेण्यात आले. त्यांचे तायातून गुन्ह्यातील चोरीस गेलेला माल ३७,७१,२००/- रु चा माल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपी नामे १. भजनाराम चुन्नाराम लेघा, रा. मु पो दातिना जि नागोर राजस्थान व २. माणकराम बबुतराम थोरी, रा. सदर यातील आरोपी हे पुणे शहरामध्ये वेगवेगळ्या बंगल्यामध्ये स्वयंपाकी काम करतात. यातून यांना फिर्यादी प्रविण चोरडीया रा मार्केट यार्ड यांच्या घराची पाहणी करुन फिर्यादी हे कुटुंबासह बाहेरगावी गेले असताना दि. ०१/१०/१७ रोजी रात्रौ ०२.०० वा च्या सुमारास शेजारच्या बंगल्यातील पाईपवरुन घरामध्ये प्रवेश करुन बंगल्यातील लोखंडी तिजोरी चोरुन राजस्थानला पळून गेले होते.

सदरच्या गुन्ह्याचा तपास हा सपोनि मोरे, पोउनि लोहकरे दरोडा प्रतिबंधक पथक, दक्षिण प्रादेशिक विभाग पोउनि कदम स्वारगेट पो स्टे, पोहवा दिनेश शिंदे, सज्जाद शेख, कृष्णा बढे, बापू खुटवड, फुलपगारे, गभाले, क्षीरसागर, पोना घाटगे, मोहिते, दड्डीकर, सुर्यवंशी, पोशि शेडगे, भोकरे, साळवी जाधव, ढोक, वलटे, शिंदे, जमदाडे जगदाळे, शितकल, कोंडे, बनसोडे तसेच परीमंडळ २ कार्यालयाचे पोना सचिन ढवळे तांत्रिक विश्लेषक यांनी मा. अपोआ दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे, मा पोलीस उप आयुक्त परीमंडळ २ व मा सहा पोलीस आयुक्त लष्कर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली केला आहे.



